नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १५/०२/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा वडोदा ते कुही रोड नागनदीचा पुलिया येथे दिनांक ०२/०२/२२ चे १९.३० वा. दरम्यान मृतक/आरोपी नामे— संकेत सुरेश कावळे, वय २२ वर्ष, रा. सावळी ता. कुही याने आपल्या ताब्यातील एमएच— ४०/बीबीडब्बलु— १७२६ क्रमांकाच्या मोटरसायकलने रितेश गौतम बोरकर याला घेवुन कुही वरून सावळी येथे जात होता. त्यादरम्यान त्याने आपले ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने वाहन चालवुन कुही वडोदा रोड नागनदी पुलिया जवळ समोरून एक मोठया वाहनाचे लाईटचे फोकस मृतक याचे डोळयावर पडल्याने आरोपी याने समोरून जाणा—या साईकल सवार याला धडक मारून जखमी केले व सोबत बसलेल्या इसमाला सुद्धा जखमी केले व स्वताचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोउपनी देविदास ठमके पोस्टे कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री चंद्रकांत मदने मोनं. ९९२२४३६१९५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील मौजा सेलू जवळील पेट्रोलपंप जवळ गोंडखैरी ते कळमेश्वर रोड येथे दिनांक ०९/०२/२२ चे दुपारी ०१.३० वा. दरम्यान फिर्यादीचे वडील पिलाजी पांडुरंग आसोले **(मृतक)**, वय ६२ वर्ष, रा. केतापार कळमेश्वर हे कळमेश्वर वरून सेलू येथे शेतीमध्ये जात असतांना कळमेश्वर ते गोंडखैरी रोडावर सेलू जवळील पेट्रोलपंपाजवळ फिर्यादीचे वडीलाचे मोटारसायकल ला अज्ञात वाहन चालक आरोपीने धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे वडील खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारा करीता प्रथम पोतदार नर्सींग होम कळमेश्वर व नंतर गेटवेल हॉस्पीटल धंतोली नागपूर येथे नेवून भरती केले. उपचार सुरू असतांना दि. ०९.०२.२०२२ चे सायंकाळी ०७.४० वा. डॉक्टरांनी मृत घोषीत केले. पो.स्टे धंतोली मर्ग क्र ००/२०२२ कलम १७४ जा.फौ चे कागदपत्रावरून फिर्यादीचे बयाणावरून सदर गुनहा नोंद

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सेलेन्द्र पिलाजी आसोले, वय ३६ वर्ष, रा. केतापार ता कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी १८४, १३४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी मेश्राम मो.क्र. ९०७५२४५०५९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा मोहपा फाटा हायवे मेनरोड उमरेड येथे दिनांक ०१/०२/२२ चे दुपारी ०७.३० वा. ते ०८.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— नितेश विनायक बांडेबूचे, वय ४० वर्ष, रा. पांजरेपार पूनर्वसन ता. भिवापूर व गावातील हरिदास ठमके वय ३२ वर्ष, रा. पांजरेपार पूनर्वसन व फिर्यादीचा भाउ मुकेश विनायक बांडेबुचे वय ३१ वर्ष, रा. पांजरेपार पूनर्वसन हे रोजमजूरीच्या कामासाठी उमरेड येथे एमएच—४०/एव्ही— ३२३५ क्रमांकाच्या मोटरसायलने टीबलसीट उमरेड कडे जात होते. त्यादरम्यान पांढऱ्या रंगाच्या टाटा एस मालवाहू चारचाकी वाहनाचे चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन झीकझॅक पद्धतीने चालवून फिर्यादीचे मोटरसायकला कट मारली. त्यामुळे फिर्यादी व त्याचे सोबत गाडीवर बसलेले हरिदास देवराव ठमके व फिर्यादीचा भाउ मुकेश विनायक बांडेबुचे गाडी सह खाली पडुन जखमी झाले. तसेच फिर्यादी हे जखमी झाले व मागून येणारा मंगेश बांडेबुचे याचे डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यास उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे नेले असता फिर्यादीचा भाउ मुकेश बांडेबुचे व गावातील हरिदास ठमके यांना तेथील वैदयकीय अधिकारी तपासून मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी १३४(अ)(ब) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि प्रशांत खोब्रागडे मो क्र ८८८८८१७१८३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**